

Published by

**Research Journal Publication Committee**

**Dr. M. K. Umathe College**

Bhamti, Ring Road, Nagpur-22 Phone No. 0712-2227062

E-mail: knowledgeresonancengp@gmail.com

झिरपण्याच्या सिध्दांताला (एज्युकेशनल फिल्टर थेअरी) याला जोतीबा फुले यांनी विरोध केला. वरच्या वर्गाच्या दयाबुध्दीतर शिक्षण अवलंबून नसावे. त्यासाठी सरकारने खास प्रयत्न करावेत. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे जातीच्या प्रमाणात नोकर भरती करावी. गरिबीमुळे मुले शाळेत जाऊ भाकत नाहीत अशाना शिष्यवृत्या, बक्षीसे दयावीत. इत्यादी सूचना महात्मा जोतिबा फुले यांनी सरकारला केल्या आहेत.

थोडक्यात शिक्षणातून माणसाचे व्यक्तिमत्व विकसित होत जाऊन, माणसाला त्याच्या गुलामीची जाणीव व्हावी हाच त्यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन होता.

**निष्कर्ष :–**

महात्मा फुले समाजसुधारक, धर्मसुधारक जातीव्यवस्थेला विरोध करणारे होते. त्यानी आपल्या कार्याची सुरुवात समाजामधील अस्पृश्य समाजाच्या मुलीच्या शिक्षणाने केली. हिंदू समाज अस्पृश्यांना जनावरासारखे अपमनित वागणून देत होते. अस्पृश्यांना शिक्षणाचे व इतर कोणतेच अधिकार नव्हते. महात्मा फुले दुर्लक्षित व वंचित अशा अस्पृश्यांना शिक्षण देऊन भारतात सर्व प्रथम समाज कांतीचे कार्य केले. अस्पृश्यांना शिक्षण देण्याच्या कार्यामुळे सनातनी मंडळीचा त्यांना फार कडवा विरोध केला. त्यांना त्या कार्यामुळे स्वतःच्या घरातुन बाहेर पडावे लागले. तरीसुध्दा महात्मा फुले यांनी आपले कार्य नेटानेच केले. शिक्षणा विषयी फुलेनीं मोलाचे कार्य केले.

महात्मा फुले यांनी समाजातील अबला पतिता यांच्या मुलांचे प्राण वाचविण्यासाठी बालहत्या प्रतिबंधकगृह स्थापन करुन त्या मुलांचा स्वतःच्या मुलाप्रमाणे केशवपना–सांभाळ केला तसेच विधवा स्त्रियांच्या केशवपना–विरोधात न्हावी लोकांचा संप घडवून आणला तसेच विधवा विवाहास प्रोत्याहन दिले. स्त्री–पुरुष समानता आण्यासाठी त्यांनी स्त्रीचे महत्व प्रतिपादन केले.

जोतिरावाच्या कार्याबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, ''हिंदु समाजातील बहूजन समाजात आम्तप्रत्यय व आत्मावलोकन उत्पन्न करणारा पहिला माणूस म्हणजे ज्योतिबा फुले होय.

**संदर्भः–**


1. *गव्हाणे, किशोरकुमार शिंदे, एस. पी. 2014, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास. औरंगाबाद : एज्युकेशनल पब्लिकेशस् ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स.*
2. *भवरे, अशोक, 2006 आधुनिक महाराष्ट्रचा इतिहास, नांदेड : कल्पना प्रकाशन.*
3. *कांबळे, सी. टी. पवळे, टी. एस. 2010. भारतातील सामाजिक चळवळीची रुपरेषा, नांदेड : क्रिएटिव्ह पब्लिकेशन्ज.*
4. *भद्रशेट, सुनंदा. शेख, बी. बी. व भालेराव बाबासाहेब. 2010. भारतातील सामाजिक आंदोलने. लातूर : अरुणा प्रकाशन.*
5. *आगलावे, प्रदीप. 2010. सामाजिक संशोधन पध्दती व तंत्रे. तिसरी आवृत्ती. नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.*

घराशेजारी स्वतःच्या खर्चाने एक वाडा बांधून घेतला. या बालहत्या प्रतिबंधक गृहाची माहिती देणारी भिंतपत्रके पुणे शहरात घराघरावर लावण्यात आली.

**3)विधवा पुनर्विवाह व केशवपनः–**

हिंदू धर्मात बालहत्या, नरबळी, वैधण्याची चाल, केशवपन, अस्पृश्यता, मूर्तिपुजा अशा अनेक दृष्ट प्रथा रुढ होत्या. विधवांना पुन्हा विवाह करण्याचे धर्माने अधिकार दिले नव्हते म्हणून समाजात विधवाचा प्रश्न निर्माण झालेला होता. या अनिष्ठ चालीरिती बंद व्हाव्यात म्हणून इंग्रज, सरकारने इ.स. 1856 मध्ये विधवा पुनर्विवाहाचा कायदा पास केला. विधवा स्त्रियांचे अत्यंत हाल होत होते ते हाल पाहून ज्योतिबांचे अंतःकरण द्रवले स्त्रियांचे हाल थांबावेत, त्यांच्या जीवनाला चांगले वळण लागावे म्हणून ज्योतिबांनी स्वतः अशाच एका विधवेच्या मुलाला दत्तक घेऊन त्याचे नाव यशवंत ठेवले व समाजापुढे एक आदर्श निर्माण केला.

**4)जातीभेद निर्मुलनः–**

समाजातील वर्णव्यवस्था व त्यातून निर्माण झालेली जातीव्यवस्था ही आर्यानी आपल्या स्वार्थासाठी निर्माण केलेली अन्यायकारक व पक्षपाती व्यवस्था होय. असे जोतीरावाचे प्रतिपादन होते. तसेच अस्पृश्यता हे जातीभेदाचे अपत्य होते समाजातील एका मोठया वर्गाला हिंदूधर्मसंस्था माणूस म्हणूनही जगण्याचा अधिकार देत नाही. कोणत्याही व्यक्तीने जाती व्यवस्थेला विरोध करु नये म्हणून समाजातील जातीव्यवस्थेच्या कल्पनेला विरोध केला. जातीभेद व वर्णभेद हे ईश्वर निर्मित नाहीत. ईश्वराने मानवाला निर्माण केल्यामुळे सर्व मानव त्या ईश्वराची लेकरे आहेत. ईश्वर आपल्या लेकरामध्ये उच्ची नीच भेद करणार नाही. जातीव्यवस्था ही आर्यांनी आपल्या स्वार्थासाठी केली. महात्मा फुले यांनी अस्पृश्यता दूर करण्यासाठी लेखन, व्याख्याने व प्रत्यक्ष कार्य करुन बहूजन समाजाचे प्रबोधन करण्याचे कार्य केले.

**5) स्त्री–पुरुष समानता :–**

स्त्रीला हिंदु समाजात कनिष्ठ स्थान आहे. स्त्रियांवर अनेक बंधने आहेत. महात्मा फुले म्हणतात. ''स्त्री आणि पुरुष एकसारखे एकंदर सर्व मानवी अधिकाराचा उपभोग घेण्यास पात्र असता स्त्रियास एका तन्हेचा नियम लागू हा निव्वळ पक्षपात होय''. अशा प्रकारे समाजात रुढ असणान्या बालविवाह, बालजठर विवाह, बहूपत्नीत्व, पुनर्विवाह, केशवपन इत्यादी दृश्ट चालीरीतीवर फूल्यांनी कडाडून हल्ले चढविले. समाजात पुरुष हा एका पेक्षा अनेक बायका करतो त्यामुळे दारिद्रय येते व त्याची संततीसुध्दा बळकट होत नाही म्हणून फूल्यांनी पुरुषांना असे सांगितले, एका पेक्षा जास्त बायका करु नयेत व त्यांनी आपल्या मुलामुलींची लग्ने लहानपणी करु नये, या साठी सरकारने कायदा करावा असा आग्रह फुल्यांनी धरला. महात्मा फुले असे म्हणतात की उभयतात जास्त श्रेष्ठ स्त्री आहे. तीचे आपल्या सर्वांना जन्म देणारी होय. आपल्या सर्वांचे लालन व पालन करुन आपल्या सर्वांचा परामर्ष करणारी होय.

**महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक कार्य :–**

**1) अस्पृश्यांना शिक्षण :–**

अस्पृश्य जातीचा समाज हा गुलामगिरी, आर्थिक हालअपेष्टा, मानसिक व शारीरिक पिळवणूक यामुळे अधः पतनाकडे चालला होता. या वर्गाला साध्या माणुसकीचे अधिकार नव्हते. स्पृश्य लोक अस्पृश्य लोकांना शिवून घेत नव्हते. स्पृश्य लोक अस्पृश्य लोकांना शिवून घेत नव्हते. अंगावर त्यांची सावली पडल्यास त्यांचा विटाळ होईल म्हणून त्यांना रस्त्याने फिरता येत नसे. गळयात मडके बांधून खराटा घेऊन रस्ते साफ करीत जावे लागत असे, सार्वजनिक ठिकाणी त्यांना अजिबात प्रवेश नसे. या समाजाला शिक्षण मिळाले तर त्यांचा उध्दार होईल, म्हणून महात्मा फुले यांनी इ.स. 1851 मध्ये अस्पृश्य मुलांसाठी पहिली शाळा पुणे येथे काढली. या कार्याने अज्ञानात खितपत पडलेल्या अस्पृस्यांना ज्ञानाचे दरवाजे खुले झाले. समाजातील सनातनी मंडळीनी अस्पृश्यांच्या शिक्षण कार्यास कडवा विरोध केला. परंतु फुले मागे झाले नाहीत. त्यानंतर फुले यांनी इ.स.1952 मध्ये वेताळ पेठेत पुन्हा अस्पृश्यांच्या मुलासांठी शाळा काढली. इ.स. 1858 मध्ये महात्मा फुले अस्पृश्यांच्या मुलांसाठी तिसरी शाळा काढली.

**2)बहुजनाना शिक्षण :–**

समाजामध्ये ब्राम्हणवर्गात शिक्षणाची मक्तेदारी होती. ब्राम्हणाशिवाय इतर वर्गांना शिक्षण घेण्याची बंदी असल्यामुळे त्यांच्यामध्ये मोठया प्रमाणात अधंश्रध्दा, अज्ञान दारिद्रय निर्माण झालेले होते. बहुजन समाजाला शिक्षण नसल्यामुळे समाजाचे कसे नुकसान झाले हे जोतीबांच्या पुढील काव्यपंक्तीवरुन समजते.

*'विद्ये विना मती गेली' मती विना नीति गेली' नीति विना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविदयेने केले.*

सरकारने बहूजन समाजासाठी सार्वत्रिक सक्तिच्या प्राथमिक शिक्षणाची सोय करावी अशी मागणी जोतिरावांनी सरकारच्या इ.स. 1882 च्या इंटर कमीशनपुढे केली. सरकारने बहूजन समाजातील मुला मुलीसाठी शिक्षणाचा कायदा करावा असा आग्रह धरला. 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहुन ब्राम्हण वर्गाने बहूजन समाजाला शिक्षणापासून कसे दूर ठेवले व त्यांच्यावर कसे अन्याय करुन गुलामगिरीच्या खाईत लोटले याची माहिती समाजाला करुन दिली. बहुजन समाजाला शिक्षणापासून दूर ठेवले बहुजन समाजाला शिक्षण नसल्यामुळे त्याची प्रगती झाली नाही.

**3) शिक्षणविशयक दृष्टिकोन :–**

भारतीय समाजाला शिक्षण मिळाले पाहिजे. या दृष्टीने जेव्हा महात्मा फुले यांनी विचार केला तेव्हा ज्योतिबांनी आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिक्षण देऊन शिक्षिका बनविले. शिक्षण म्हणजे सामाजिक कांतीची तयारी कसा महात्मा जोतिबा फुले याचा दृष्टीकोन होता. शिक्षण सर्व मुलामुलींना मिळाले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. शिक्षण अत्याचारगृस्त स्त्रियांना मिळालं तर आपल्यावर होणान्या आन्यायाचं भान स्त्रियांना येईल व हे भानच त्यांना अन्यायाच्या विरोधात लढण्यासाठी संघटित होण्याचे बळ देईल याची फुलेंना खात्री होती.

'शिक्षण हे वरच्या वर्गाच्या थरातून झिरपत जाऊन खालच्या वर्गापर्यंत झिरपत येईल'. या लॉर्ड मेकाले यांच्या

ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# समाजसूधारणेत महात्मा फुले यांचे योगदान

**डॉ. सौ. रायठक दिपमाला विश्वनाथ**
*समाजशास्त्र विभागप्रमुख*
*श्री संत जनाबाई शिक्षण संस्थेचे,*
*कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, ता.गंगाखेड जि.परभणी*

**प्रस्तावना :–**

महात्मा ज्योतिराव फुले यांचे आधुनिक. महाराष्ट्राच्या इतिहासात 'समाज क्रांतीचे' जनक म्हणुन अग्रभागी स्थान प्राप्त झाले आहे. कारण आधुनिक महाराष्ट्राची जडण–घडण महात्मा फुले यांच्या पासून सुरु होते. 'सत्यमेव जयते' या दिव्य तत्ववाचा पुरस्कार करुन, स्वतः आचरण करुन एक आदर्श निर्माण केला. त्यामुळेच त्यांना 'महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर' म्हणून ओळखले जाते. ज्योतिराव फुले यांचे मूळ घराणे सातारा जिल्हयातील कटगुण या गावचे होय. ज्योतिरावांचे पूर्वज कामधंदयाच्या निमित्ताने पुण्याला येऊन स्थायिक झाले. त्यांच्या आजोबाचे नाव भोटिबा होय. त्यांचे घराणे हिंदू समाजातील क्षेत्रिय–माळी जातीचे असून त्यांचे आडनाव गोन्हे असे होते. भोटींबाची घरची आर्थिक परिस्थीती बिकट असल्यामुळे प्रारंभी भोळया राखण्याचे काम केले. त्यांच्या धन्पाने त्यांचा प्रमाणिकपणा, हूशारी व कष्टाळूपणा पाहून त्यांना फुलांचा व्यवसाय शिकवला. त्यांनी या व्यवसायात चांगलाच लैकिक कमावला. त्यामुळे त्यांचे गोन्हे हे आडनाव मागे पडून फुले या नावाने ओळखले जाऊ लागले.

महात्मा ज्योतिबांचा जन्म 1827 साली झाला. त्यांच्या वडीलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई. ज्यातिबांची आई ज्योतिबांच्या लहानपणीच एक वर्षाचे असतानांच वारली. ज्योतीबा आणि त्यांचा भाऊ या दोघांना सांभाळण्यासाठी दाई ठेवली. दाईने दोन्ही मुलांचा चांगला सांभाळ केला. ज्योतिबाला वयाच्या सातव्या वर्षी खाजगी शाळेत शिक्षणास पाठविले. वयाच्या 13 व्या वर्षी त्यांचा विवाह सातारा जिल्यातील खंडाळा तालुक्यातील नायगावच्या खंडोजी नेवसे पाटील यांच्या साविऱ्रीबाई या कन्येशी झाला थॉमस पेन या अमेरिकन विचारवंताच्या 'Rights of Man' या ग्रंथातील विचारांचा त्यांच्या मनावर प्रभाव पडू लागला. ज्योतिबा एका ब्राहमण वित्राच्या लग्नाला गेले होते. वरातीच्या वेळी ब्राहमणेतर मुलाने नवरदेवा बरोबर चालणे, ब्राम्हाणोना आवडले नाही त्यांनी फुल्यांचा अपमान केला. ब्राम्हाण जातीचे वर्चस्व आणि अन्यायकारक अपमानास्पद वागणूक यामुळे. त्यांनी ब्राम्हाण जाती विरुध्द बंड उभारले. त्यांच्या विचारांना कलाटणी मिळाली. समाजक्रांतीचा झेंडा उभारण्याचे ध्येय याच हेतुपूर्ण घटनेतून साकार झाले.

**शोध निबंधाची उध्दिष्टये :–**

1. महात्मा ज्योतिबा फुले यांचे समाज सुधारणा विषयक कार्य अभ्यासणे.
2. महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्त्री उध्दाराचे कार्य अभ्यासणे.
3. महात्मा ज्योतिबा फुलेंचे शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.

**महात्मा ज्योतिबा फुले यांचे समाज सुधारणाविषयक विचारः–**

महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्रियांच्या उध्दाराचे कार्य हाती घेतले. त्यासाठी त्यांनी अतोनात कष्ट सहन केले, स्त्री ही समाजाचे मूळ आहे असे माणून स्त्री शिक्षण, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंध, केशवपन यासारख्या अनेक सामाजीक सुधारणांचा पाया घातला. स्त्रियांना अनेक बंधनांनी जखडून ठेवले होते. स्त्री एक उपभोग्य वस्तू अशीच त्यांच्याकडे पाहण्याची वृत्ती होती. आशा वेळी महात्मा ज्यातिबा फुले यांनी स्त्रीयांच्या उध्दाराचे कार्य काती घेतले. ते एक खरे समाजसुधारक होते. त्यांनी स्वतःला एक विव्दान व्यक्ती म्हणून समाजले नाही. एक सच्चा कार्यकर्ता आणि तोही समाजातील विषमता दूर करणारा थोर समाजसूधारक होते.

**1)स्त्री शिक्षणाची सुरुवातः–**

भारतीय समाज व्यवस्थेने स्त्रियांना समतेपासून व शिक्षणापासून वंचित ठेवले होते. व्यक्तीचा सर्वांगिण विकास होण्यासाठी शिक्षण ऐ एक प्रमुख साधन आहे. असे फुलेंचे मत होते. शतकानुशतके स्त्री वर्ग हा शिक्षणापासून वंचित होता. मुलांच्या व्यक्तीमत्वाचा विकास मातेकडून होतो. कर्तव्याची जाणीव मातेकडून होते. मुलांची प्रगती झाली तर देशाची प्रगती होते या विचारांचे ज्योतिबा होते. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उध्दारी हा त्यांचा मूलमंत्र होता. यासाठी स्त्रीला शिक्षण देणे हाच उपाय ओळखून 1848 च्या ऑगस्ट महिन्यात ज्योतिबांनी आपले जिवलग मित्र सदाशिवराव गोवंडे यांच्या साहयाने पूण्यातील बुधवार पेठेतील भिडयांच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा स्थापन केली. अस्पृश्य समाजातील स्त्रियांना तेथे शिक्षण दिले जात होते.

स्त्री–शिक्षणासाठी भााळा काढणारे भारतातील व आधुनिक महाराष्ट्रातील ते पहिले समाजसुधारक होते.

**2)बालहत्या प्रतिबंधक गृह :–**

हिंदू समाजामध्ये बालविवाहाची प्रथा रुढ होती. समाजात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारल्यामुळे अंधश्रध्दा व अज्ञान मोठया प्रमाणात निर्माण झाल्या. पतीच्या मृत्युनंतर मुलीला संबंध जीवन विधवा अवस्थेत जगावे. तरुण विधवा कोणाच्यातरी वासनेला बळी ठरत असत त्यातूनच त्या गरोदर राहात या प्रसंगामूळे बाहेर पडण्यासाठी आत्महत्या किंवा भ्रूणहत्या हाच पर्याय विधवा स्त्रीयांपूढे असे. यातूण अशाा स्त्रियांची सुटका करण्यासाठी विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी आणि आपली मुले तेथे ठेवण्यासाठी ज्योतिबांनी इ.स. 1863 मध्ये आपल्या


ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

| | | |
|---|---|---|
| 39. | निरीक्षणांचे निरीक्षण<br>श्रीमती मंदा प्रकाश उमाठे* डॉ. सरिता देशपांडे** | 139 |
| 40. | बेकारी सामाजिक समस्याः एक समाजशास्त्रीय अध्यन<br>प्रा. डॉ. राजेंद्र यादवराव बारसागडे | 142 |
| 41. | कीर्तन परंपरेतील स्त्री अभिव्यक्ती<br>डॉ. अनघा तेंडुलकर | 145 |
| 42. | भारतातील ग्रीन बँकिंग<br>प्रा. डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे*, प्रा. डॉ. श्रद्धानंद बाबासाहेब माने** | 149 |
| 43. | वर्तमान कालीन समस्यांच्या संदर्भात ज्ञानेश्वरीतील अभयमिमांसा<br>ले.– गणेश मुरलीधर बडे | 152 |
| 44. | वेठबिगारी– एक सामाजिक समस्या<br>बंडू पाटेकर | 158 |
| 45. | भारतीय सार्वजनिक उपक्रमांची विकासाचा प्रादेशिक असमतोल कमी करण्यातील भूमिका<br>डॉ. बाळासाहेब निर्मळ | 161 |
| 46. | पर्यावरण समस्या आणि सुरक्षा<br>डॉ. आर. जी. टाले | 164 |
| 47. | व्यंकटेश माडगूळकर यांची 'सत्तान्तर': एक पुनरावलोकन<br>प्रा. शैलेश औटी | 168 |
| 48. | आदिवासी आर्थिक समस्या आणि विकास: चिकित्सक अध्ययन<br>भाग्यश्री स. होले | 174 |
| 49. | आदिवासींचे संघर्षमय जीवन<br>डॉ. सोमा पी. गोंडाणे | 177 |
| 50. | भारतीय संविधानात आदिवांसीकरिता असलेल्या विविध तरतुदी<br>डॉ.विद्या नामदेवराव खंडारे | 181 |
| 51. | संत नामदेवांच्या अभंगरचनेतील कृषिविषयक जाणिवा<br>प्रा. डॉ.ज्ञानबा महादू गाडे | 186 |
| 52. | आदिवासी साहित्य प्रवाहातील कविता व सद्य:स्थिती<br>डॉ. शिवराज काचे | 188 |
| 53. | सत्याचे प्रयोग आत्मचरित्र आणि गांधींना झालेली स्वः जाणिव<br>संजय जनार्धन आगलावे | 193 |
| 54. | विधवा महिलांच्या समस्या व समाजसुधारकांची कार्य<br>डॉ. पोपळघट राजू शेषराव | 196 |
| 55. | पर्यावरण आणि मानवी हस्तक्षेप<br>श्री. दत्तराव पंतू पवार | 199 |
| 56. | एका तेजस्विनीची चित्तरकथा: मास्तरांची सावली<br>डॉ.लक्ष्मण ना. वाघमारे | 202 |
| 57. | स्त्री मुक्ती चळवळतील राजश्री शाहू महाराज यांचे योगदान<br>देशमुख प्रतीक्षा ब्रह्मदेव | 205 |
| 58. | भविष्यातील भारत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार<br>डॉ. सागर लोकनाथ बडगे | 207 |
| 59. | Exploring Anita Desai's Fasting, Feasting with feminist view<br>Swapnil R. Dahat | 211 |
| 60. | समाजसुधारणेत महात्मा फुले यांचे योगदान<br>डॉ. सौ. रायठक दिपमाला विश्वनाथ | 214 |

# KNOWLEDGE RESONANCE

ISSN : 2231-1629
A HALF YEARLY PEER REVIEWED REASERCH JOURNAL
(Evaluated in the SJIF Journal Masters List Evaluating Process with Impact Factor of 8.072 for Year 2021 )

A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal




Vol 10 No.2 July-Dec. 2021

Research Journal Publication Committee
Dr. M. K. Umathe College, Nagpur